केंद्र पुरस्कृत SITP अंतर्गत राज्यातील वस्त्रोद्योग संकुलांना अर्थसहाय्य /अनुदान मंजूर करणेबाबत.
(सत्यराज इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क प्रा. लि. इचलकरंजी, जि. कोल्हापूर).

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. टेक्सपा २०१५/प्र. क्र. ६३/टेक्स-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, नविन प्रशासकीय भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २८ मार्च, २०१९.

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक : टेक्सपा-२०११/प्र. क्र. ९८/टेक्स-४, दि.२५ मे, २०१२.
२) शासन निर्णय क्रमांक : टेक्सपा-२०१५/प्र. क्र. ६३/टेक्स-४, दि.०४ मार्च, २०१६.
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८.
४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५ जानेवारी, २०१९.

प्रस्तावना:-

केंद्र पुरस्कृत एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजनेअंतर्गत एकात्मिक वस्त्रोद्योग संकुलांना प्रकल्प किंमतीच्या ४०% किंवा रु. ४०.०० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य ४ टप्प्यात मंजूर करण्यात येते. त्याचप्रमाणे राज्यात मंजूर झालेल्या व भविष्यात मंजूर होणा-या एकात्मिक वस्त्रोद्योग संकुलांना प्रकल्प किंमतीच्या ९% किंवा रु. ९.०० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्याची योजना वाचा क्र. १ येथील शासन निर्णय दि. २५ मे, २०१२ अन्वये सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासन त्यांच्या हिश्याच्या अर्थसहाय्याची रक्कम ज्या प्रमाणात मंजूर करेल त्या प्रमाणात राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या हिश्याच्या अर्थसहाय्याची रक्कम मंजूर करण्यात येईल अशी उपरोक्त शासन निर्णयात तरतूद आहे. केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत सत्यराज इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क प्रा.लि., इचलकरंजी, जि.कोल्हापूर या वस्त्रोद्योग संकुलांस केंद्र शासनाने एकूण रु. १०.०० कोटी (रुपये दहा कोटी फक्त) इतकी रक्कम मंजूर करुन वितरीत केली आहे. राज्य शासनामार्फत केंद्राच्या प्रमाणात रु. २.२५ कोटी इतकी रक्कम देय आहे. यापूर्वी शासनाच्या दिनांक ०४ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये रु. ९० लाख (रुपये नव्वद लाख फक्त) इतके अर्थसहाय्य/अनुदान सत्यराज इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क प्रा.लि., इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांस मंजूर करुन वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित रक्कम रु. १.३५ कोटी (रुपये एक कोटी पस्तीस लाख फक्त) अनुदान सदर वस्त्रोद्योग संकुलांस वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद वस्तुस्थितीच्या अनुषंगाने केंद्र पुरस्कृत SITP योजने अंतर्गत राज्यात मंजूर झालेल्या **सत्यराज इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क प्रा.लि., इचलकरंजी, जि.कोल्हापूर या वस्त्रोद्योग संकुलांस केंद्राच्या प्रमाणात उर्वरित रक्कम रु.१.३५ कोटी (रुपये एक कोटी पस्तीस लाख फक्त) इतके अर्थसहाय्य** वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८ मधील व परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५ जानेवारी, २०१९ मधील अटी व शर्तींच्या अधीनतेने मंजूर करुन वितरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू वस्त्रोद्योग संकुलास वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार या शासन निर्णयात दिलेल्या बँकेच्या खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी. त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित संकुलाने शासनास सादर करावे.

३. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (०२)(६०) वस्त्रोद्योग संकुल उभारणे (केंद्र योजना) (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य(२८५१ ५२६४)" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. शासन परीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक- अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल,२०१८ अन्वये, ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील परिछेद ६ ते १० पैकी ६ अ,२,७ (१)(अ)(आ), ७(२),७(३), ७(४),७(५),७(६),७(७),७(८),७(९) या प्रकरणी लागू नाही. तसेच या परिपत्रकातील परिच्छेद ६ब, ६क,८ व ९ मधील या प्रकरणी लागु असलेल्या अटींची तसेच या परिपत्रका सोबतच्यापरिशिष्ठ मधील तपासणी सूचीप्रमाणे (अनुक्रमांक ८) सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे. या योजनेखाली निधी वितरीत करताना उपरोक्त शासन परिपत्रकातील परि. ५ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

५. सदर योजना ही नियमित राज्य योजनांतर्गत योजना असल्याने व “अर्थसहाय्य” या शिर्षाखाली अर्थसहाय्य वितरण असल्याने, शासन परीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक- अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.१, २, ५, ६, ७ मधील तरतूदीनुसार या प्रकरणी नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

६. सदर योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्ती मध्ये बदल होत नसल्याने, शासन परीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.३ व ४ मधील तरतूदीनुसार नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

७. वित्त विभाग, परीपत्रक, क्र.संकिर्ण२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि.१०/०५/२०१६ च्या परिशिष्ट-अ मधील अनु.क्र. १ ते ९ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागु असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे. सदर परीपत्रकानुसार परिशिष्ट-अ मधील अनु.क्र.१ ते ९ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहे-

१) **विभागास प्रदान वित्तीय अधिकार :-** वित्त विभाग परीपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/४/२०१५ अन्वये ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

२) **मंजूर निधी :-** " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (०२)(६०) वस्त्रोद्योग संकुल उभारणे (केंद्र योजना) (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य(२८५१ ५२६४)" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी वित्तिय तरतूद व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रू.लाखात)

सन २०१८-१९ **साठी अर्थसंकल्पिय तरतूद**	**४००.००**
वित्तविभागाच्याआदेशानुसारचालूआर्थिकवर्षातयापूर्वीवितरित/खर्चझालेलानिधी	०.००
अर्थसंकल्पिय तरतूदीतील शिल्लक निधी	४००.००

सन २०१८-१९ **साठी सुधारीत अंदाजाद्वारे उपलब्ध तरतूद**	३२०.००
एकुण खर्चासाठीउपलब्धअसलेलानिधी	३२०.००
या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी	१३५.००
शिल्लकनिधी	**१८५.००**

३) मागील ३ महिन्यापूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे :- होय

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे,त्या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- या योजनेखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशिर्षाखाली प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे:-लागू नाही

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- लागू नाही.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यापुर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत :- लागू नाही.

९) खरेदी विषयक प्रक्रीया अद्यावत संबंधीत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :-लागू नाही.

८. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.८ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागु असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे. सदर परीपत्रका सोबतच्या परिशिष्ठातील अनु.क्र.८ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहे :-

१) योजनेस प्रशासकिय मान्यता - शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक शासन निर्णय क्रमांक : टेक्सपा-२०११/प्र. क्र. ९८/टेक्स-४, दि.२५ मे, २०१२. नुसार योजनेस प्रशासकिय मान्यता आहे.

२) निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता झाल्यानंतरच होणार आहे.- शासननिर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता होत आहे.

३) यापूर्वीवितरीत केलेल्या ७५ % निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र- संबंधित वस्त्रोद्योग घटकांना यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

४) यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत:- सद्य:स्थितीत नाहीत.

५) निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे :- होय.

६) वस्तु खरेदी करण्यापुर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र:-लागू नाही.

७) यामधून खरेदी करण्यापुर्वी खरेदी असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयके अदा केले जाणार आहे. :- लागू नाही.

८) आवश्यक त्या ठिकाणी आदीवासी सामाजिक न्याय यांची निधी वितरणास सहमती आहे :-लागू नाही.

९) प्रस्तूत योजनेत संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :-कुठलेही देयक प्रलंबित नाही.

१०) निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे - नाही.

<u>**९. अन्य अटी व शर्ती :-**</u>

अ) राज्य शासनाकडून मंजूर होणारा निधी संबंधित वस्त्रोद्योग संकुलांच्या नांवे एक दुय्यम खाते (Subsidiary account) उघडून त्यामध्ये जमा करण्यात यावा.

ब) केंद्र शासनाने त्यांच्या एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजनेअंतर्गत प्रकल्प उभारणी व निधीवरील नियंत्रणासाठी Special Purpose Vehicle (SPV) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची जी जबाबदारी निश्चित केली आहे. ती जबाबदारी राज्य शासनाने वितरीत केलेल्या निधी संदर्भातही राहील. याशिवाय राज्य शासनाने मंजूर केलेल्या निधीच्या वापराबाबत SPV व PMC यांचेबरोबर संचालक (वस्त्रोद्योग) यांची देखील जबाबदारी राहील.

क) केंद्र शासनाने एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजनेच्या अंमलबजावणीसाठी निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार निधीचे विनियोजन करण्यासंदर्भात बंधपत्र लिहून देण्याची अट घालण्यात आली आहे. त्याप्रमाणे राज्य शासनाच्या हिश्याच्या निधी विनियोजनाबाबत बंधपत्र लिहून घेण्याची जबाबदारी संचालक वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची राहील.

ड) संकुलांना राज्य शासनामार्फत वितरीत केलेल्या अर्थसहाय्याचा योग्य विनियोग होत आहे किंवा कसे याबाबत महालेखापाल यांचेकडून लेखापरीक्षण करण्यात येईल. सदर लेखापरीक्षणासाठी आवश्यक दस्तऐवज महालेखापालांना उपलब्ध करुन देणे प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

१०. वाचा क्र. ३ व ४ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार ८०% निधी वितरीत करण्यास संबंधित विभागास अधिकार दिले आहेत. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८ अन्वये ३३ अर्थसहाय्य या बाबीखाली खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून अटींची पूर्तता होत आहे.

११. वाचा क्र. २ येथे नमूद शासन निर्णयात नमूद केल्यानुसार वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दिनांक १७ एप्रिल, २०१५ व परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दिनांक १२ जानेवारी, २०१६ मधील अटी व शर्ती कायम राहतील. तसेच वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील अटी व शर्ती लागू राहतील.

१२. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबंधितांना वितरीत करण्याकरीता श्री. र.गं. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणनू घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. ब.बा. चव्हाण, सह सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन सत्यराज

इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क प्रा.लि., इचलकरंजी, जि.कोल्हापूर (Satyaraj Integrated Textile Park Pvt. Ltd., Ichalkaranji, Dist. Kolhapur) या एकात्मिक वस्त्रोद्योग संकुलास खालील बँक खात्यामध्ये RTGS द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

Name of Bank- INDIAN OVERSEAS BANK, ICHALKARANJI (Ichalkaranji Branch, Tirupati, 12/28, Main Road, Near Shree Ram Terri Center, Ichalkaranji-416115)
Account No- 274302000000173
MICR Code- 416020201
IFSC Code- IOBA0002743
CUSTOMER ID- 35767213

५. यावरील खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीत तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक दि.०२/०४/२०१८ व २५/०१/२०१९ नुसार विभागास दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१६०४०५७२०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SUDHAKAR BABURAO YADAV

Digitally signed by SUDHAKAR BABURAO YADAV
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=51aa6fcbae77d07f85b511c87b0a9d28b6e7efd01fe8bdf47957a0a22d8364eb, cn=SUDHAKAR BABURAO YADAV
Date: 2019.03.28 16:08:20 +05'30'

(सु. बा. यादव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
२) सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे स्वीय सहायक
३) सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे स्वीय सहायक
४) महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता महाराष्ट्र-१ मुंबई
५) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१ मुंबई
६) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र -२, नागपूर.
७) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र--२, नागपूर
८) वित्त विभाग, (कार्यासन व्यय-२/अर्थसंकल्प-१३/ अर्थसंकल्प-१२) मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
९) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
१०) संचालक,वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
११) अधिदान व लेखा अिधकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३) कार्यासन अधिकारी, रोख शाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४) अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१५) अध्यक्ष, सत्यराज इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क प्रा.लि., इचलकरंजी, जि.कोल्हापूर.
१६) निवड नस्ती (टेक्स-४).